RNI No. MAHBIL /2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ७, अंक १०]    मंगळवार, फेब्रुवारी १६, २०२१ / माघ २७, शके १९४२    [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

### शहर विकास विभाग

### जाहीर सूचना

क्रमांक ठामपा/मुख्या-१/शविवि-२९/वियोअंक/१३६९.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टीपीएस/१२९७/१३१९/सी.आर-१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ अन्वये मंजूर असून, २२ नोव्हेंबर १९९९ पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टीपीएस/१२०१/२७४/सीआर-२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल, २००३ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, ठाणे शहरातून अहमदाबाद हायवेकडे जाण्याकरिता घोडबंदर रस्त्याचा वापर होत आहे. सदर घोडबंदर रस्ता विकास आराखड्यानुसार ६०.०० मी. रुंद असून, रस्त्याच्या दोन्ही बाजूस सर्व्हिस रस्ता तयार केला आहे. सदर रस्त्यावर सद्यःस्थितीत सुरु असलेल्या मेट्रो मार्गाच्या बांधकामामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. घोडबंदर रस्त्यावर दोस्ती इंम्पेरिया जंक्शनपासून उड्डाणपूल सुरु होत असून, उक्त जागेत मेट्रो मार्ग येत असल्याने उड्डाणपुलाचे बाजूने मानपाडा जंक्शन जाणाऱ्या वाहतुकीस रस्तारुंदी कमी पडत असल्याने उक्त ठिकाणी अतिरिक्त सर्व्हिस रस्ता करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याअनुषंगाने सेक्टर क्र. ४ चितळसर मानपाडा येथील सोहम गार्डन समोरील (दोस्ती इम्पेरिया चौकापासून ते मानपाडा जंक्शन पर्यंत) सर्व्हिस रस्त्याची रुंदी अतिरिक्त ९.०० मी. दर्शविण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार फेरबदलाची कार्यवाही करणेस मा. महासभा ठराव क्र. ३५२, दिनांक २१ डिसेंबर २०१९ अन्वये मान्यता दिलेली आहे. (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे.) ;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार "उक्त मंजूर विकास योजनेत" "उक्त फेरबदलांबाबत" आम जनतेच्या सूचना/हरकती मागविण्यासाठी ही जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे. उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा सहायक संचालक नगररचना, ठाणे महानगरपालिका, "महापालिका भवन", जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचे कार्यालयीन सूचना फलकावर व खाली नमूद केलेल्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. उक्त फेरबदलाबाबत कोणत्याही व्यक्तीस सूचना/हरकती घ्यावयाची असल्यास त्यांनी ही सूचना वृत्तपत्रात व *www.thanecity.gov.in* या संकेत स्थळावर आणि **महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसांचे आत आपली सूचना/हरकत महापालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेकडे अथवा E-mail ID-*adtp@thanecity.gov.in* वर सादर करावी.

संकेत स्थळ : *www.thanecity.gov.in*

**श्रीकांत देशमुख,**
सहायक संचालक नगररचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे,
दिनांक १५ फेब्रुवारी २०२१.

# THANE MUNICIPAL CORPORATION, THANE

## TOWN PLANNING DEPARTMENT

### Notice

No.TMC Hq.1/TDD-29/DPIC/1369.— Whereas, the Revised Development Plan of the city of Thane has been Sanctioned by Government *vide* Notification No. TPS/1297/1319/CR-148/97/UD-12, Dated 4th October, 1999 & came into force from 22nd November 1999. Also the Development Plan for Excluded portion (EP) from Revised Development plan was sanctioned *vide* Government's Notification No. TPS/1201/274/CR-28/2009/UD-12, Dated 3rd April 2003 and came into force from 14th May 2003 (Here in after referred to as "The said Sanctioned Development plan") ;

And whereas, Ghodbunder road is being used to travel towards Ahmedabad highway through Thane city. As per Development Plan Ghodbunder road is 60.00mtr. wide and service road is developed on both the sides. At present, since the construction of Metro work is in progress, lot of traffic congestion occurs there. On Ghodbunder road, flyover is starting from Dosti Imperia Junction and Metro line also aligned besides the flyover, hence the road width is insufficient for traffic going towards Manpada junction besides the flyover. Therefore there is necessity to construct additional 9.00 mtr. wide service road at this location. Accordingly in sector 4, Chitalsar Manpada infront of Soham Garden (from Dosti Imperia Junction to Manpada Junction) for showing additional 9.00 mtr. service road, it is necessary to follow the procedure of modification laid under section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Hon. General Body of Thane Municipal Corporation has accorded sanction for the above said procedure of modification *vide* it's resolution No. 352, dated 21st December 2019 (hereinafter called as 'said modification')

And therefore, this notice is published for inviting suggestions/objections from the public to carry out "The said Modification in The said Sanctioned Development Plan" as per the provisions under section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. The Plan showing "The said modification" is displayed on the notice board in the office of Assistant Director Town Planning, Town Development Department, Thane Municipal Corporation, "Mahapalika Bhavan", General Arunkumar Vaidya Marg, Chandanvadi, Panchpakhadi,Thane and also published on web site mentioned below. Any person who wants to submit suggestion may submit his suggestion or objection to the said modification within 30 (Thirty) days from the publication of this notice in the news paper, on the website *www.thanecity.gov.in* and *Maharashtra Government Gazette*, to the Municipal Commissioner, Thane Municipal Corporation, Thane or on the E-mail ID - *adtp@thanecity.gov.in.*

Web Site - *www.thanecity.gov.in*

SHRIKANT M. DESHMUKH,
Asst. Director Town Planning,
Thane Municipal Corporation, Thane.

Thane,
dated the 15th February 2021.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.